अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड
www.surajyadigital.com । बुधवार, दि. २३ एप्रिल २०२५ । वर्ष : २३ वे अंक : २०४ वा किंमत : ५ रुपये पाने ८

## पहलगाम येथे पर्यटकांवर दहशतवाद्यांकडून हल्ला; २७ ठार

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटक आणि स्थानिकांवर अंदाधुंद गोळीबार केला. या गोळीबारात २७ व्यक्तींचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. त्यात पर्यटकांसह स्थानिकांचाही समावेश आहे. जखमींमधील काही पर्यटक महाराष्ट्राचे आहेत.

जुलैमध्ये अमरनाथ यात्रेला सुरुवात होणार आहे. त्यापूर्वी पर्यटकांवर हल्ला झाल्याने सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्यक्षदर्शींनी संपूर्ण घटनाक्रम सांगितला. दहशतवादी पोलिसांच्या गणवेशात आले होते. त्यांनी पर्यटकांना त्यांची नावे विचारली. हिंदू नावे ऐकताच त्यांनी अंदाधुंद गोळीबार सुरु केला. बेसराण खोऱ्यात घोडेस्वारी करणाऱ्या पर्यटकांच्या एका समूहाला त्यांनी लक्ष्य केले. या हल्ल्याची जबाबदारी टीआरएफने घेतली आहे. या संघटनेच्या दहशतवाद्यांनी याआधीही अन्य राज्यांतील लोकांवर हल्ले केले आहेत. दहशतवाद्यांचा शोध सुरक्षा दलांकडून घेतला जात आहे. हेलिकॉप्टरच्या मदतीनं दहशतवाद्यांचा शोध सुरु आहे. पर्यटकांना लक्ष्य करणारे काही दहशतवादी पोलिसी गणवेशात होते. त्यामुळे स्थानिकांसह पर्यटकांनाही त्यांच्याबद्दल कोणतीच शंका आली नाही. ८ ते १० दहशतवादी पोलिसांचा गणवेश परिधान करुन आले होते. हल्ल्यानंतर आयजी, डिआयजी यांच्यासह बडे अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत.

# ‘दयानंद’च्या हॉस्टेलवर विद्यार्थिनीची आत्महत्या
# चोरीच्या आरोपामुळे नैराश्यातून जीवन संपवले

## उत्तर सोलापूर तालुक्यातील तरटगावमधील संतप्त नातेवाईकांचे ठिय्या आंदोलन

**सोलापूर/प्रतिनिधी**

**सोलापुरातील दयानंद महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतिगृहामध्ये अकरावी सायन्सला शिकणाऱ्या विद्यार्थिनीने ओढणीने हॉस्टेलच्या रूममध्येच गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी सायंकाळी सातच्या सुमारास उघडकीस आली. स्नेहा सौदागर गायकवाड (वय १९ रा. तरगटगाव, मु.पो. उळे, ता. उत्तर सोलापूर) असे त्या मुलीचे नाव आहे. हा प्रकार समजताच तिच्या नातेवाईकांनी व लोकांनी महाविद्यालात येवून ठिय्या आंदोलन केले.त्यामुळे काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. नातेवाईकांनी वसतिगृहाच्या प्रशासनाविरूद्ध तक्रार केली असून या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली.**

### जोडभावी पोलीस ठाण्यातही मारला ठिय्या
### कॉलेज प्रशासनावर कारवाईची मागणी

**लग्न जमले होते**

स्नेहा दिसायला सुंदर होती. तिला मुलाची पसंतीही आली होती. स्नेहाच्या होकारानंतर लग्नही जमणार होते. त्यातच या मुलीने जीवन संपवल्यामुळे आईला अश्रू अनावर झाले होते.

स्नेहाने अकरावी सायन्सची परीक्षा देऊन बारावीला गेली होती. ती आपल्या मैत्रिणी सोबत दयानंद कॉलेजमधील मुलींच्या वसतीगृहामध्ये रूम न. ६ मध्ये राहत होती. तिच्यावर वसतिगृह प्रशासनाकडून चोरीचा आरोप केल्यामुळे ती तणावात होती. त्यामुळे काही दिवस ती आपल्या गावी गेली होती. पालकांनी समजूत घालून तिला पुन्हा वसतिगृहात आणून मंगळवारीच सोडले होते. सहा दिवसांनी पुन्हा ती गावाहून वसतिगृहात परतली. मंगळवारी सायंकाळी तिच्या मैत्रिणी बाहेर गेल्यानंतर स्नेहा एकटीच वसतिगृहातील खोलीमध्ये होती. तिने सर्वप्रथम दरवाजा लावून घेतला आणि खिडक्यांना कागद लावून खिडक्या बंद केल्या. त्यानंतर पलंगावर खुर्ची ठेवून तिने स्वतःच्या ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. अन्य मुली बाहेरून वसतिगृहावर आल्यानंतर त्यांना दरवाजा बंद दिसला. त्यांनी तत्काळ वसतीगृह प्रमुखांना बोलावले. वसतिगृह प्रमुखाने जोडभावी पोलिसांना बोलावून दरवाजा तोडला.त्यावेळी त्या स्नेहाने गळफास घेतल्याचे लक्षात आले. हे. कॉ. आर. डी. दुधाळे यांनी तिला फासातून सोडवले. दरम्यान मुलीने गळफास घेतल्याचे त्यांच्या कुटुंबियांना सांगितल्यानंतर आईसह नातेवाईक कॉलेज परिसरात आले. मुलीचा मृतदेह पाहून त्यांनी हंबरडा फोडला. पोलिसांच्या गाडीसमोर संतप्त झालेल्या नातेवाईकांनी ठिय्या मांडला. काहीवेळ दयानंद कॉलेजसमोर रास्ता रोको आंदोलन रकत चौकशी करण्याची मागणी केली. वसतिगृहाचे अधीक्षक आणि महाविद्यालय प्रशासनावर कारवाई करण्याची मागणी लावून धरली.

काही दिवसांपूर्वी याच महाविद्यालयाच्या एका इमारतीवरून एका तरूणाने उडी मारून आत्महत्या केली होती. मंगळवारी आत्महत्येची दुसरी घटना घडल्याने हे महाविद्यालय पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.



### नातेवाईकांचा पोलीस स्टेशनमध्येही ठिय्या

त्या विद्यार्थिनीच्या मृत्यूची बातमी समजल्यानंतर नातेवाईकांनी कॉलेज परिसरात तर गोंधळ घातलाच शिवाय जोडभावी पोलिस स्टेशनमध्येही ठिय्या मारला. आमच्या मुलीच्या आत्महत्येस जबाबदार असणाऱ्या त्या मॅडमवर करवाई करा, त्यानंतरच आम्ही येथून जाणार अशी भूमिका नातेवाईकांनी घेतली. पोलिसांनी नातेवाईकांना तक्रार द्यावी, आम्ही चौकशी करू अशी ग्वाही दिल्यानंतर नातेवाईक शांत झाले. रात्री साडेआठ वाजेपर्यंत मुलीचे नातेवाईक पोलिस स्टेशनमध्ये ठिय्या मारून होते.

### स्नेहावर होता चोरीचा आरोप

स्नेहा वसतीगृहामध्ये रहात असताना तिच्यावर सहकारी मुलींचे ड्रेस चोरल्याचा आरोप वसतिगृहातील एका मॅडमने लावला होता. त्यामुळे ती अस्वस्थ होती. त्यातूनच ती गावाकडे निघून गेली होती. निराश होती. ती कॉलेजमध्ये पुन्हा जाण्यास नकार देत होती. तरीसुद्धा समजावून आपण तिला आजच वसतिगृहामध्ये आणून सोडले होते असे नातेवाईकांनी सांगितले. त्या मॅडमला आम्ही पाहिले आहे मात्र नाव माहिती नाही, त्यांना समोर आणा आम्ही ओळखतो, अशी स्नेहाची आई पोलिसांना हंबरडा फोडून सांगत होती.

### आईची तक्रार

स्नेहाने आत्महत्येपूर्वी चिठ्ठी लिहल्याचे दिसून आले. त्यामध्ये आपण जीवनाला कंटाळलो आहोत. आपल्या आत्महत्येला कोणालाही जबाबदार धरू नये, असे लिहिले असल्याचे सांगण्यात येते. पोलिसांनी चिठ्ठी जप्त केली आहे. दरम्यान, ही आमच्या मुलीची नसून वसतिगृह प्रशासनाने तयार केल्याची तक्रार त्या मुलीच्या आईने केली आहे.

---

## पेटत्या कापूरने कपडे पेटून विवाहिता भाजली

**सोलापूर :** पूजा करीत असताना खाली पडलेल्या जळत्या कापुरने अंगावरील कपडे पेटल्याने २१ वर्षीय विवाहिता भाजून जखमी झाली. ही घटना अंकोली (ता.मोहोळ) येथे सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली.

प्रतीक्षा सचिन सलवदे (वय २१ रा. अंकोली ता.मोहोळ) असे भाजलेल्या विवाहितेचे नाव आह. त्यांना उपचारासाठी नितीन सलवदे (दीर) सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. गावात यात्रा असल्याने प्रतीक्षा सलवदे या रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास पूजा करीत होत्या. त्यावेळी ताटातील जळते कापूर खाली पडले. त्यामुळे अंगावरील कपड्याला आग लागून त्यांचे दोन्ही हात आणि पाय भाजले. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## अस्वस्थता महिन्यांची!
# मनीषा मुसळे हा फक्त ‘ट्रिगर!!’

**सोलापूर/खास प्रतिनिधी**

डॉ. शिरीष वळसंगकर यांनी आत्महत्येचे पाऊल हे भावनेच्या भरात अचानक उचललेले पाऊल नाही. याची पुष्टी करणाऱ्या अनेक बाबी समोर येत आहेत. गेल्या महिनाभरापासून डॉक्टर कमालीचे अस्वस्थ होते, आणि त्यांनी ही ‘सल’ त्यांच्या निकटवर्तीयांकडे बोलून दाखवली होती. ओळखीच्या अनेक रुग्णांना शस्त्रक्रिया येथेच करायची की दुसरीकडे याचा निर्णय आपण घ्यावा, असे डॉ. शिरीष वळसंगकर सांगत होते. रुग्णांसाठी ही आश्चर्याची बाब होती. देण्या-घेण्याचे अनेक व्यवहार डॉक्टरांनी गेल्या पंधरवाड्यात पुढाकार घेऊन संपविले होते. डॉ. शिरीष वळसंगकरांनी त्यांचे मृत्युपत्र सोलापुरातील नव्हे, तर सांगली येथील वकिलाकडून तयार करून घेतले होते, आणि आत्महत्येपूर्वी त्यांनी त्यात बदल करून घेतला होता. संशयित मनीषा मुसळे-माने हिचे प्रकरण हा ‘ट्रिगर’ होता, कारण हे प्रकरण घडायच्या खूप आधीपासून डॉक्टर अस्वस्थ होते, असे त्यांचे निकटवर्ती सांगत आहेत.

### मनीषा मुसळेच्या केबिनची झडती
### अन् मंगळवारी रात्री वेगळीच कुजबुज




डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरणात पोलीस कमालीची गुप्तता पाळत आहेत. त्यामुळे अनेक तर्क–वितर्कांना जागा मिळत आहे. मंगळवार (ता.२२) सदर बझार पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी साधारण सात तास वळसंगकर हॉस्पीटलची अक्षरश: झाडाझडती घेतली. यावेळी अनेकांचे जबाबदेखील त्यांनी नोंदवले. यादरम्यान संशयित मनीषा मुसळे– माने हिच्या केबीनच्या झाडाझडतीत सोने, चांदी आणि सह्यांचे काही व्हाऊचर्स सापडल्याची कुजबुज वळसंगकर हॉस्पीटल परिसरात मंगळवारी रात्री उशीरापर्यंत होती. मात्र या संदर्भात पोलिसांकडून दुजोरा मिळाला नाही.

## डॉ. वळसंगकरांच्या आत्महत्येचं पिक्चर होणार आज क्लिअर
# धमकावणारी मनीषा मुसळे-मानेच, की सतावणारं अन्य कोण?
### पोलीस सांगणार थेटच | उत्सुकता पोहोचेल शिगेला

**सोलापूर/प्रतिनिधी**

**महाराष्ट्र हादवून टाकणाऱ्या डॉ. शिरीष वळसंगकरांच्या आत्महत्येच्या पार्श्वभूमीवर, दररोज नवनवीन माहिती समोर येत आहे. शिवाय आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी संशयित म्हणून हॉस्पीटलची प्रशासन अधिकारी मनीषा मुसळे-माने हिच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून ती अटकेत आहे. दरम्यान याच वळणावर डॉ. वळसंगकरांच्या आत्महत्येचं सगळंच पिच्चर बुधवार (ता.२३) क्लिअर होणार आहे. यासंबंधी खुद्द सदर बझार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित लकडे यांनी मंगळवार (ता.२२) प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना तसा निरोप दिला आहे.**



दरम्यान, तपास अधिकारी यांच्याकडून बुधवारी या घटनेच्या पार्श्वभूमीवर, सगळी माहिती मिळणार आहे, तेव्हा धमकावणारी मनीषा मुसळे-माने हीच मारेकरी ठरणार की डॉ. वळसंगकरांना सतावणारं दुसरं कोणी? याचा उलगडा होणार आहे.

या संदर्भात लकडे म्हणाले, आज मंगळवारी संशयित आरोपीकडे पुन्हा एकदा सखोल विचारपूस केली आणि तपास करण्यात आलेला आहे. शिवा य वळसंगकर हॉस्पीटलला भेट देऊन चौकशी करण्यात आलेली आहे. सविस्तर माहिती आपल्याला तपास झाल्यावर उद्या देण्यात येईल, असे त्यांनी निरोप नमुद केले आहे.

बहुचर्चित डॉ. शिरीष वळसंगकरांच्या आत्महत्येच्या पार्श्वभूमीवर, मित्र परिवार, निकटवर्तीय तसेच नातेवाईक यांच्याकडून वेगवेगळी माहिती पुढे येत आहे. संबंधितांकडून हवाला घेऊन प्रसारमाध्यमेदेखील ती माहिती प्रसिद्ध करीत आहेत, प्रसारीत करीत आहेत. डॉ. वळसंगकरांच्या आत्महत्येस कारणीभूत असल्यावरुन मनीषा मुसळे-माने हिच्यावर संशयित म्हणून गुन्हा दाखल असला तरी त्यांच्या आत्महत्येला कौटुंबिक कलह कारणीभूत आहे, त्या पार्श्वभूमीवर, डॉ. वळसंगकरांची अत्यंत जवळची नातेवाईक हीच त्या घटनेला कारणीभूत असल्याचा दावा डॉ. वळसंगकर प्रेमींकडून केला जात आहे. हे सगळे लक्षात घेता, पोलीस आज काय नेमकी माहिती देतात, शिरीष सरांची मारेकरी मनीषा की नातेवाईकांपैकी दुसरे कोणी? याची उत्सुकता शिगेला पोचणार आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



‘पहलगाम’

संगम श्री डे
558-88-567

संगम श्री नाईट
570-22-246

कल्याण
469-91-335

मुंबई
559-90-244

# मारहाणीत आजोबांच्या मदतीला धावला; फेकलेला दगड लागून नातवाचा जीव गेला

### बार्शी तालुक्यातील सर्जापूरमध्ये किरकोळ कारणावरून अल्पवयीन युवकाची हत्या : तीन अल्पवयीन युवक ताब्यात

**बार्शी/प्रतिनिधी**

बार्शी तालुक्यातील वैराग जवळच्या सर्जापूरमध्ये किरकोळ कारणावरून अल्पवयीन युवकाची तीन अल्पवयीन युवकांनी दगडाने मारहाण करून हत्या केल्याची घटना सोमवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडली. आमच्या तोंडावर बॅटरी का मारली म्हणून तिघे अल्पवयीन युवक एकाला मारहाण करत होते.आपल्या आजोबांना मदत करण्यासाठी नातू धावला पण त्या तिघांमधील एकाने भिरकावलेला दगड डोक्याला लागला. त्यात गंभीर जखमी होवून नातवाचा जीव गेला. याबाबत अल्पवयीन युवकांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत मयताचा पिता अमर अन्सर पाटील (वय ३८, धंदा शेती, राहणार सर्जापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांचे चुलते शाहीर व अकबर पाटील यांचे गावालगत वडिलोपार्जित शेती व घर आहे. दिनांक २१ एप्रिल रोजी रात्री आठ ते साडेआठच्या दरम्यान त्यांना बहीण सानियाने अमर पाटील यांचा मुलगा इमरानला अज्ञात व्यक्तींनी मारहाण केल्यामुळे तो दशरथ डोळसे यांच्या घरासमोर रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात पडला असल्याचे सांगितले. त्यानंतर अमर पाटील हे त्या ठिकाणी गेले असता त्यांना त्यांचे चुलते शाहीर पाटील यांनी शेतावर बाथरूमकडे जाताना त्यांना तीन युवक शेतावर उभारलेले दिसले. त्यामुळे त्यांनी त्यांच्यावर बॅटरीचा उजेड दाखवला असता त्या तिघा अल्पवयीन युवकांनी आमच्या तोंडावर बॅटरी का मारतोस म्हणून शाहीर पाटील यांना काठीने व दगडाने मारहाण केली. मारहाणीत आरडाओरडा केल्यानंतर त्यांचा आवाज ऐकून इमरान हा आजोबा शाहीर मदतीला धावून गेला. त्यावेळेस त्याला तिघांपैकी एका इसमाने दगड फेकून मारला. त्यामुळे इमरान हा रक्तबंबाळ होऊन रस्त्यावर आडवा पडला. इमरानचे पिता अमर व त्यांचे चुलत भाऊ अरबाज यांनी इमरानला उचलून मोटारसायकल वरून वैराग येथील डॉ. मोटे यांच्या हॉस्पिटलमध्ये नेले तेव्हा डॉ. मोटे यांनी इमरानला रक्तस्त्राव जास्त झाला असल्यामुळे त्याला बार्शी येथील दवाखान्यात घेऊन जावा असे सांगितले त्यानंतर पाटील बंधूंनी इमरानला बार्शीतील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये नेले तेव्हा तेथील डॉक्टरांनी इमरान याला मृत घोषित केले. त्यानंतर घडलेल्या घटनेबाबत अमर पाटील यांनी वैराग पोलीस स्टेशनमध्ये येऊन तीन इसमांविरुद्ध फिर्याद दिली आहे याबाबत अधिक तपास पोलीस निरीक्षक कुंदन गावडे करत असून त्यांनी तीन अल्पवयीन युवकांना या प्रकरणात ताब्यात घेतले असून त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्यांना बाल न्यायालयात हजर करणार असल्याचे सांगितले.

### जीवे ठार मारण्याची फिर्याद

माझे चुलते शाहिर इस्माईल पाटील यांना शिवीगाळी करुन दगडाने व काठीने मारहाण केली व माझा मुलगा इमरान यास आमचेच गावातील शेतामध्ये बसलेले तिघा तरूणांपैकी कोणीतरी डोक्यात दगड मारुन त्यास गंभीर जखमी करुन जीवे ठार मारल्याची फिर्याद मयत इमरानचे वडील अमर पाटील यांनी दिली आहे.